**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला,
चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/१०६७४९६/२०२४ पिंपरी-चिंचवड दिनांक- १७/०६/२०२४

**☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना☆**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरील रिक्त पदांची पोलीस भरती २०२२-२०२३ प्रक्रिया पार पडत आहे. सदर भरती प्रक्रियेअंतर्गत उमेदवारांचे शारीरीक मोजमाप व मैदानी चाचणी संत ज्ञानेश्वर क्रिडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी येथे दिनांक १९/०६/२०२४ ते दिनांक २४/०६/२०२४ व दिनांक ०१/०७/२०२४ ते १०/०७/२०२४ रोजी दरम्यान पार पडणार असुन सदर ठिकाणी वाहतुक कोंडी होण्याची शक्यता असल्याने वाहतुक बदल करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी विशाल गायकवाड, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**भोसरी वाहतुक विभाग अंतर्गत**

- भोसरी इंद्रायणीनगर महादेव मंदिर ते श्री स्वामी समर्थ सी.बी.एस.ई स्कुल गेट नं-२ दरम्यानचे रस्त्यावरुन सर्व प्रकारच्या वाहनांना येण्या-जाण्याकरीता मनाई करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- १. भोसरी तिरुपती (सहारा) चौकाकडुन इंद्रायणीनगर स्वीट कॉर्नर चौकाकडे येणारी वाहतुक श्री स्वामी समर्थ सी.बी.एस.ई स्कुल गेट नं- २ येथे उजवे बाजुस वळुन इंद्रायणीनगर पोलीस वसाहत मिनी मार्केट मार्गे रामकृष्ण मोरे प्रवेश व्दारातुन बाहेर पडुन इच्छित स्थळी जातील.

पर्यायी मार्ग :- २. भोसरी इंद्रायणीनगर स्वीट कॉर्नर चौकाकडून तिरुपती चौकाकडे जाणारी वाहतुक महादेव मंदीर येथुन डावे बाजुस वळुन रामकृष्ण मोरे प्रवेशव्दारातुन मिनी मार्केटच्या पुढे राकेश स्वीट मार्गे इच्छित स्थळी जातील.

तरी वरील प्रमाणे सर्व प्रकारच्या वाहनांना (अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ. वगळुन) आवश्यकतेनुसार प्रवेश बंद करण्यात येत असून नागरीकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा.

सदर अधिसुचनेची अमंलबजावणी दिनांक १९/०६/२०२४ रोजी ते दिनांक २४/०६/२०२४ व दिनांक ०१/०७/२०२४ ते दिनांक १०/०७/२०२४ रोजी पहाटे ०४.०० वा. ते १६.०० वा.दरम्यान दिनांक २३/०६/२०२४ व दिनांक ०७/०७/२०२४ रोजीची शासकीय सुट्टी वगळुन लागु करण्यात येत आहे.

15/06/24

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी भोसरी वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड
२/- वाहतुक बदलाचे अनुषंगाने ठिकठिकाणी दिशादर्शक/मार्गदर्शक फलक लावावेत.

Scanned with OKEN Scanner